**''प्रेस नोट''** **दिनांक ०१/०८/२०२६**

## <u>मुंबई शहरात ओळख लपवून वावरणाऱ्या उत्तर प्रदेशातील गँगस्टर ॲक्टमधील गँग लीडर पाहिजे आरोपीस येलोगेट पोलीसांनी पकडलेबाबत.</u>

मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या दक्षिण परिमंडळ-३ अंतर्गत येलोगेट पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने उत्कृष्ट माहिती संकलन, तात्काळ प्रतिसाद व आंतरराज्य समन्वयाच्या बळावर उत्तर प्रदेशातील गँगस्टर ॲक्ट अंतर्गत पाहिजे आरोपी असलेल्या गँग लीडरला मुंबईतून ताब्यात घेण्यात उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

दिनांक ३०/०७/२०२६ रोजी यलोगेट पोलीस ठाणेचे दिवसपाळी पर्यवेक्षक पोलीस निरीक्षक, श्री. निलेश कांबळे यांना गोपनीय बातमीदारामार्फत एक सराईत गुन्हेगार बे व्ह्यू हॉटेल परिसरात संशयास्पदरित्या वावरत असल्याची गोपनीय माहिती प्राप्त झाली. सदर माहितीचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस निरीक्षक, निलेश कांबळे यांनी तात्काळ गुन्हे शोध पथकासह घटनास्थळी जावुन शोध मोहिम राबवून शिताफीने संशयित इसम नामे निशांत राजेश सिंग, वय २३ वर्षे, रा.ठी. ग्राम - बलोरीया, थाना - सीतावली, तहसील - सीतावली, जि. सितापूर, राज्य - उत्तर प्रदेश याचेकडे चौकशी केली. प्राथमिक चौकशीदरम्यान नमुद इसमाने स्वत:ची ओळख लपविण्याचा प्रयत्न करीत उडवाउडवीची उत्तरे दिली. त्याचे संशयास्पद वर्तन लक्षात घेऊन त्यास पुढील सखोल चौकशीसाठी येलोगेट पोलीस ठाण्यात आणण्यात आले.

त्याचेकडे केलेल्या सखोल चौकशी व तांत्रिक पडताळणी दरम्यान संबंधित इसमाविरुद्ध उत्तरप्रदेशातील सीतापूर जिल्ह्यात जबरी चोरी, विना परवाना अवैध अग्नीशस्त्र बाळगणे असे तीन गंभीर गुन्हे नोंद असल्याचे निष्पन्न झाले. नमुद इसमाचा गुन्हेगारी अभिलेख तपासला असता त्याचेवर उत्तरप्रदेश येथील अटारिया पोलीस ठाणे, जिल्हा सीतापूर येथे गु.र.क्र. १६७/२०२६, कलम २(ब)(प) व ३(१) उत्तर प्रदेश गिरोहबंद समाजविरोधी क्रियाकलाप (निवारण) अधिनियम, १९८६ (Gangsters Act) अंतर्गत गुन्हा दाखल असल्याचे निष्पन्न झाले.

सदरवेळी अटारिया पोलीस ठाणेशी संपर्क साधून नमुद इसमाचे छायाचित्र व इतर तपशील त्यांना पाठवून त्याचेवर दाखल असलेल्या गुन्हयाची पडताळणी केली असता सदर इसम हा नमुद गुन्हयातील मुख्य आरोपी व गँग लीडर असून तो नमुद गुन्हयात पाहिजे आरोपी असल्याबाबत माहिती प्राप्त झाली. तसेच त्याला उत्तरप्रदेश येथील पोलीस शोधत असल्याबाबत सांगून त्याची चौकशी व ताबा घेण्यासाठी त्यांचे पथक रवाना होत असल्याचे संबंधित पोलीस अधिकारी यांनी सांगितले. त्याअनुषंगाने दि.०१/०८/२०२६ रोजी सदर पथक यलोगेट येथे पोहचुन सदर आरोपीत इसमाकडे चौकशी करुन तोच पाहिजे आरोपी असल्याचे सांगितल्याने सदर आरोपीताचा रितसर ताबा सिधौली पोलीस ठाणे, जि. सितापुर, राज्य उत्तरप्रदेश येथील पोलीसांना देण्यात आला आहे.

आंतरराज्य गुन्हेगारांविरुद्ध प्रभावी समन्वय, गुप्त माहितीचे अचूक विश्लेषण आणि त्वरित पोलीस प्रतिसाद याचे आधारे यलोगेट पोलीस ठाणेच्या पोलीसांनी एका आंतरराज्यातील सराईत गॅंगस्टर पाहिजे आरोपीतास पकडण्यात यश प्राप्त केले आहे. मुंबई पोलीस नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी, संघटित गुन्हेगारीविरुद्ध कठोर कारवाई करण्यासाठी तसेच देशातील विविध राज्यांतील पोलीस यंत्रणांशी प्रभावी समन्वय राखून पाहिजे व फरार गुन्हेगारांना न्यायालयासमोर उभे करण्यासाठी कटिबद्ध आहेत.

सदरची कामगिरी मा. श्री. देवन भारती साो., पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मा. श्री. मनोज शर्मा साो., पोलीस सह आयुक्त, (का.व.सु.), मा. श्री. शैलेश बलकवडे साो., अपर पोलीस आयुक्त, दक्षिण प्रादेशिक विभाग, मुंबई, मा. श्री. विजयकांत सागर साो., पोलीस उप आयुक्त, दक्षिण परिमंडळ -३, मुंबई. मा. श्री. पोपट आव्हाड साो, सहायक पोलीस आयुक्त, यलोगेट विभाग मुंबई, श्री. रमेश चांदिवडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, यलोगेट पोलीस ठाणे, मुंबई. यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. निलेश कांबळे, पोलीस निरीक्षक, स.पो.नि. सौरभ पिंगळे (गुन्हे प्रकटीकरण अधिकारी) तसेच गुन्हे प्रकटीकरण पथकातील पो.ह.क्र. ०७१३०२/ उज्वल चौधरी, पो.शि.क्र. ०९१०६०/ प्रल्हाद मांडवे, पो.शि.क्र. १७१३१९/ प्रशांत पवार व म.पो.शि.चा.क्र. २१६७४३/ रितू मोकल यांनी यशस्वीरित्या पार पाडलेली आहे.

-------------